रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

शिर्डी : पोस्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.क्र.साईसंस्थान/वशी/वाहन/ 3745 /२०२५,
दि. 28 JAN 2025

प्रति,

---

---

---

**विषय :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी कडील १०९ वाहनांचा दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या एक वर्ष कालावधीकरीता विमा पॉलिसी नुतनीकरण करणे कामी दरपत्रक देणे बाबत...**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे वाहन विभागाकडील वाहनांचा दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६ या एक वर्ष कालावधीकरीता सोबतच्या परिशिष्ट 'अ' मधील ०८ वाहनांचा विना घसारा (Zero Dep) पॉलीसी, परिशिष्ट 'ब' मधील ८९ वाहनांचा फुल विमा (Package Policy) तसेच परिशिष्ट 'क' मधील १२ वाहनांचा थर्ड पार्टी विमा (Third Party) प्रकारचा अशा एकुण १०९ वाहनांचा विमा नुतनीकरण करावयाचा आहे. या वाहनांचे विमा नुतनीकरण करणे करीता खालील अटी शर्तीस अनुसरुन आपले कंपनीचे सिलबंद दरपत्रक देण्याचे करावे.

अटी व शर्ती:-

**संस्थान वाहनांचे विमा नुतनीकरण करणे कामी निविदाधारक राष्ट्रीयकृत विमा कंपनीचा शाखाधिकारी व खाजगी कंपनी (IRDAI मान्यता प्राप्त) करीता अधिकृत सिग्नेटरी असणे आवश्यक आहे.**

1. सर्व १०९ वाहनांची नोंदणीचे वर्ष, खरेदी किंमत, आसन क्षमता, प्रवासी संख्या, आयडीव्ही, इत्यादी बाबत तपशिलवार माहीतीचे परिशिष्ट 'अ', 'ब' व 'क' या सोबत जोडलेले आहेत.
2. **संस्थानचे १०९ वाहनांचे परीशिष्टानुसार विमा प्रकार I.D.V. रक्कम नुसारच विमा पॉलिसी नुतनीकरण करणे कामी G.S.T. व GST TDS सहीत दर देणेत यावेत.**
3. **आपले कंपनीस GST TDS लागु नसलेस तसे पत्र दरपत्रका सोबत देण्यात यावे. ते न दिल्यास मंजुर रकमेतुन नियमानुसार GST TDS रक्कम कपात करून उर्वरीत अग्रीम रक्कम देण्यात येईल.**
4. परिशिष्ट 'अ', 'ब', व 'क' मधील वाहनांच्या स्वतंत्र विमा पॉलिसी द्याव्या लागतील. (एकत्रीत विमा पॉलीसी स्विकारण्यात येणार नाहीत.)
5. **आपले दरपत्रकात परिशिष्ट 'अ', 'ब', व 'क' मध्ये नमुद केलेल्या प्रत्येक वाहनांची विमा हप्ता रक्कम नमुद करणे आवश्यक आहे. या दरानुसारच वाहनाच्या पॉलीसीमध्ये विमा हप्ता रक्कम देण्यात यावी. तथापी दरपत्रकात दिलेल्या वाहन निहाय विमा हप्ता रक्कमे पेक्षा पॉलीसी वरील विमा हप्ता रक्कम कमी असलेस सदर रक्कम आपणास संस्थान खाती जमा करावी लागेल व दरपत्रकात दिलेल्या विमा हप्ता रक्कमे पेक्षा पॉलीसी वरील विमा हप्ता रक्कम जास्त असेल तर सदर रक्कम आपणास परत देण्यात येणार नाही.**
6. **दरपत्रकातील वाहन निहाय आपण दिलेला विमा हप्ता रकमेनुसारच वाहनांच्या पॉलीशी देणे बंधनकारक राहील. अशा पॉलीशीच ग्राह्य धरण्यात येतील.**

पान नं २.वर

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in

Scanned with OKEN Scanner

7. परीशिष्ट 'अ', 'ब', व 'क' मध्ये दिलेल्या विमा करावयाच्या वाहनांची संख्या कमी होऊ शकते. अशावेळी आपण दिलेल्या वाहन निहाय दरानुसार त्याप्रमाणात रक्कम कमी करून देण्यात येईल
8. **ज्या विमा कंपनीचे दर मंजुर होतील त्यांनी कार्यादेश दिलेल्या परिशिष्ट 'अ', 'ब', व 'क' नुसार सर्व वाहनांच्या तयार केलेल्या वार्षीक विमा पॉलिसी दोन प्रतीत व पॉलिसी निहाय आलेल्या खर्चाचे तपशिलवार तक्त्यासह विवरणपत्र संस्थानचे वाहन विभागात दि.३०.०४.२०२५ अखेर पोहोच करणे बंधनकारक राहील.**
9. प्राप्त निवीदेतील निम्नतम दरांचा विचार करता प्रत्येक परीशिष्ट प्रमाणे वाहनांचा विम्याचा कार्यदिश देणे किंवा सर्व वाहनांचा एकत्रीत विम्याचा कार्यादेश देणे अथवा वाहन निहाय निम्नतम दरानुसार कार्यदेश देणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवला आहे. या बाबत कोणताही खुलासा देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
10. **आपले दरपत्रकानुसार मंजुर झालेल्या दराने विमा पॉलिसी करुन देणे आपणांवर बंधनकारक राहील. या दरात कोणत्याही कारणास्तव दर वाढ दिली जाणार नाही अथवा कोणतेही अतिरीक्त कर देय होणार नाहीत.**
11. परिशिष्ट 'अ', 'ब', व 'क' मधील वाहनांची वार्षीक कालावधीकरीता विमा पॉलीसी करणे करीता निम्नतम दर धारक व संस्थानने मान्य केलेली रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येईल.
12. **कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबत निविदाधाकास खुलासा देणे संस्थानला बंधनकारक नाही.**
13. **वाहनांचा विमा नुतनीकरणकरीता विमा हप्ता रक्कम दिल्यानंतर नवीन पॉलिसी संस्थानच्या ताब्यात मिळेपर्यंतच्या कालवधीत संस्थान वाहनाचा अपघात / नुकसान झालेस त्याची भरपाई देणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.**
14. चुकीच्या तपशिलाच्या विमा पॉलिसी स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच त्यामुळे होणारे नुकसानीस सर्वस्वी विमा कंपनी जबाबदार राहील.
15. सर्व विमा पॉलीसीवर संस्थानचा GST क्रमांक टाकणे बंधनकारक राहील.
16. **दिलेल्या सर्व विमा पॉलीसीवर Direct Code नमुद असावा तसेच एजंटचे नाव नसावे.**
17. संस्थान वाहनांचा विमा करणे करीता राबवीण्यात आलेली दरपत्रके प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधीकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवण्यात आलेला आहे.
18. विमा पॉलिसीचा कार्यदेश व विमा रक्कम शिर्डी कार्यालयातुन अदा होणार असल्याने सदरील व्यवहाराबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता/मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ छ.संभाजीनगर यांचे न्याय कक्षेत राहील.
19. सदर दरपत्रके सिलबंद पाकिटातुन देणेत यावीत. पाकिटावर **" संस्थानच्या वाहनांचा विमा नुतनीकरण करणेची दरपत्रके"** असे ठळक अक्षरात नमुद करुन सदर दरपत्रके **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी** यांचे नांवाने व **मु.पो. शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर** या पत्त्यावर **दि.** १७ /०२/२०२५ अखेर पोहचतील अशी पाठवावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने...**

२७/०१/२५

(संदिपकुमार भोसले)
प्रशासकीय अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned with OKEN Scanner